शंभरावं, अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन, आता सुरू झालेलं आहे. या संमेलनाचे मान्यवर अध्यक्ष डॉ.जब्बार पटेल यांना आधीच मी शुभेच्छा देतो.

मी, नागपूर येथे संपन्न झालेल्या 99 व्या मराठी नाट्य संमेलनाचा अध्यक्ष...दि.22 ते 25 फेब्रुवारी 2019 या काळात हे संमेलन संपन्न झालं. आणि वर्षभर संमेलनाच्या अध्यक्षांनी काहीएक काम करावं अशी अपेक्षा... मी वर्षभर महाराष्ट्रात नाट्य परिषदेच्या शाखांच्या सहकार्यानं 10 नाट्य लेखन कार्यशाळा घेतल्या. 30 संहिता वाचल्या गेल्या. मान्यवर तज्ज्ञांच्या उपस्थितीत चर्चा झाली आणि 5 निवडक नाटकांची निवड करून त्या नाटकांचा एक महोत्सव मुंबईत परिषदेच्या वतीनं घेण्यात यावा असे सुचवले. सोबतच वाचलेल्या 30 संहितावर आधारित एक समीक्षा ग्रंथ... सर्व कार्यशाळांना उपस्थित नाटककार - पत्रकार महेंद्र सुके यांनी सिद्ध करावा असेही आम्ही सूचित केले होते. पण यातलं काहीच घडलं नाही. याशिवाय वर्षभर आम्ही 75 कार्यक्रमांना उपस्थित राहिलो आणि मराठी नाटक कौटुंबिक चौकटीतच जे अडकून पडलं आहे त्याला बाहेर काढण्यासाठी ...वेदना... जाणीव... नकार... विद्रोह... करूणा... आणि व्यक्ती विरुद्ध व्यक्ती... व्यक्ती विरुद्ध समाज... समाज विरूद्ध समाज... समाज विरूद्ध राष्ट्र... राष्ट्र विरूद्ध राष्ट्र... राष्ट्र विरूद्ध जग.... ही अकरा ज्ञान सूत्रे अर्थात बोधी सूत्रे आम्ही या कार्यशाळाधून समजावून सांगितली.

आमच्या कार्यकाळातच शंभरावं नाट्य संमेलन सांगली येथे डॉ.जब्बार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली दि.25 ते 28 मार्च 2020 या तारखांना आयोजित केले होते. आणि हे संमेलन मराठी रंगभूमीचे आद्य नाटककार शाहराज राजे भोसले यांच्या नाट्य वाङमयाला ... वंदन करून सुरू होणार होते. त्यासाठी तत्कालीन अध्यक्ष प्रसाद कांबळी आणि कार्यकारिणी चे पदाधिकारी आणि नाट्य संमेलनाध्यक्ष प्रेमानंद गज्वी तंजावरला जाऊन , सरस्वती महालात सुरक्षित ठेवलेल्या आद्य मराठी नाटककार शाहराज राजे भोसले यांच्या नाट्य वाङमयाला वंदन करायला आम्ही दि. 25 मार्च 2020 रोजी निघणार होतो पण आदल्याच दिवशी दि. 24 मार्च रोजी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोरोना संकटामुळे देशभर लॉकडाऊन जाहीर केला. परिणामी सदर नाट्य संमेलन आणि संमेलनाचे निमित्ताने वर्षभर होणारे सर्व उपक्रम स्थगित करण्यात आले.

कोरोना संपला.... तरी आणि अनेक कारणांनी स्थगित झालेले नाट्य संमेलन होऊ शकले नाही मग परिषदेची निवडणूक झाली. नवीन कार्यकारिणी निवडण्यात आली... तोपर्यंत 2020 ते 2023 इतका काळ निघून गेला.

आता पुणे - पिंपरी चिंचवड येथे नाट्य परिषदेचे नवे अध्यक्ष मान. प्रशांत दामले आणि त्यांची नवी टीम यांच्या मार्गदर्शनाखाली दि. 5 - 6 -7 जानेवारी 2024 या तारखांना स्थगित झालेले ते 100 वे संमेलन डॉ . जब्बार पटेल यांच्याच अध्यक्षतेखाली संपन्न होत आहे. ही आनंददायी घटना होय.

शंभराव्या नाट्य संमेलनाच्या या मनोज्ञ महनीय नाट्य पर्वाची सुरूवात मराठी रंगभूमीचे आद्य नाटककार शाहराज राजे भोसले यांच्या नाट्य वाङमयाला वंदन करून होत आहे ही आनंददायी घटना होय. परिषदेचे पदाधिकारी सतीश लोटके, गिरीश महाजन आणि संमेलनाचे अध्यक्ष नाटककार प्रेमानंद गज्वी तंजावरच्या सरस्वती महालात नुकतेच जावून नी वंदन करून आले. या शंभराव्या नाट्य संमेलनाचे निमित्ताने, 'सीता स्वयंवर ' कार विष्णुदास भावे यांनाही सांगलीला जाऊन अभिवादन करण्यात आले...

तरीही अनेकांना एक प्रश्न पडलाच असेल नी ते स्वाभाविकच होय.... कोण हे... आद्य मराठी नाटककार शाहराज राजे भोसले आणि संबंध काय मराठी रंगभूमीशी....तर मोठा घनिष्ठ संबंध आहे...

छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा रायगडावर १६७४ साली झाला आणि बरोब्बर दोनच वर्षांनी तामिळनाडूतील तंजावर येथे आणखी एका मराठी माणसाचा राज्याभिषेक सोहळा १६७६ झाला. कोण बरे हा मराठी माणूस? हा मराठी माणूस म्हणजे शिवाजी महाराजांचा सावत्र बंधू व्यंकोजी भोसले.

हे व्यंकोजी भोसले तंजावरला कसे गेले? तर इ.स. १६७५ साली त्रिचीचा पराभव करण्यासाठी आदिलशहाने त्यांना तंजावरला पाठवले.त्रिची आणि व्यंकोजी या दोघांत युद्ध झाले आणि व्यंकोजींनी त्रिचीचा पराभव केला. पुढं आदिलशहाचा मृत्यू झाला आणि व्यंकोजींनी स्वतःचा १६७६ साली राज्याभिषेक सोहळा करवून घेतला. अशा या व्यंकोजींना पत्नी दीपांबिका पासून तीन पुत्र झाले.शाहराज,सरफोजी, तुकोजी. शाहराज (जन्म - १६७०) हा हुशार आणि कल्पक होता. त्याची हुशारी पाहून व्यंकोजींनी शाहराज चौदा वर्षांचा असतानाच १६८४ साली त्याचा राज्याभिषेक केला. पण पित्याला मुलाची हुशारी अनुभवता आली नाही. कारण व्यंकोजींचं १६८७ सालीच निधन झालं. खरं तर

१६८४ साला पासूनच शाहराज नाटकं लिहू लागला होता. पण ते इतरांना फारसं माहीत नव्हतं. इ. स.१६८४ ते१७११ या काळात शाहराजनं बावीस मराठी, वीस तेलगु, तीन हिंदी, एक संस्कृत, एक तामिळ अशी विपुल नाट्य रचना केली. 'पंचभाषाविलास' हे नाटक तर ... मराठी, तेलगु, तामिळ, हिंदी, संस्कृत अशा पाच भाषांचा वापर करून लिहिले आहे. हे तर अलौकिक भाषा प्रतिभेचंच लेणं होय.

अशा या अलौकिक मराठी नाटककाराचा सन्मान अ. भा. मराठी नाट्य परिषद तर करीलच पण महाराष्ट्र शासनानंही दहा लाख रुपये रोख रकमेचा भरीव असा, " आद्य मराठी नाटककार शाहराज राजे भोसले,जीवन गौरव पुरस्कार" दरवर्षी एका बोधिवंत - ज्ञानवंत नाटककारास द्यावा अशी विनंती आणि मागणी आम्ही करीत आहोत.

आणि ही मागणी करीत असतानाच.... मान. अध्यक्ष प्रशांत दामले , सरचिटणीस अजित भुरे आणि कोषाध्यक्ष सतीश लोटके आणि परिषदेच्या कार्यकारिणी तील सर्व पदाधिकारी यांचे अभिनंदन करतो. अभिनंदन यासाठी की त्यांनी आमची विनंती मान्य केली.

विनंती एक : आद्य नाटककार शाहराज राजे भोसले यांनी १६९० साली, 'लक्ष्मी नारायण कल्याण' हे पहिलं मराठी नाटक लिहिलं आणि मराठी रंगभूमीचा पाया घातला गेला म्हणून मराठी नाट्य परिषदेनं, आद्य नाटककार शाहराज राजे भोसले यांच्या नावे... नाटककारांसाठी, 'नाट्य जीवन गौरव पुरस्कार' सुरू करावा.

विनंती दोन : नाटककार विष्णुदास भावे यांनी १८४३ साली , 'संगीत सीता स्वयंवर' हे नाटक लिहिलं. ते तिकीट लावून सादर केलं आणि व्यावसायिक रंगभूमीचा पाया घातला.यासाठी “व्यावसायिक रंगभूमी, पुरस्कार” नाटककार विष्णुदास भावे यांचे नावे सुरू करावा.

विनंती तीन :नाटककार ज्योतीबा फुले यांनी १८५५ साली, 'तृतीय रत्न ' हे नाटक लिहिलं आणि मराठी रंगभूमीवर प्रायोगिक रंगभूमीचा पाया घातला. हे काळाच्या पटलावर सिद्ध झाले आहे आणि म्हणून नाटककार ज्योतीबा फुले यांचे नावे, 'प्रायोगिक नाट्यलेखन पुरस्कार' सुरू करावा.

विनंती चार : नाटककार काशीबाई फडके यांनी १८८७ साली, 'संगीत सीताशुद्धी' हे नाटक लिहिले. हे एका स्त्री नाटककारानं लिहिलेलं पहिलं मराठी नाटक होय आणि म्हणून नाटककार श्रीमती काशीबाई फडके यांच्या नावे, ‘स्त्री नाट्यलेखन पुरस्कार' सुरू करावा.

आणि या चारही विनंती नाट्य परिषदेनं मान्य केल्या यासाठी आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहोत...

आणि आणखी काही विनंती...

१) नाट्य परिषदेनं परिषदेची वास्तू बांधली. कार्यालय बांधले. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बांधले. अठरा वर्षं झाली. पण या आधुनिक वास्तूत नाट्य संमेलनाच्या अध्यक्षाला बसण्यासाठी स्वतंत्र दालन नाही. संमेलनाचे अध्यक्षपद एक वर्षाचे आहे. आणि अध्यक्षांनी काही एक सन्माननीय काम करावे अशी अपेक्षा आहे. आणि त्यासाठी संमेलनाचे अध्यक्षासाठी स्वतंत्र दालन असायला हवे.

२) १९०५ साली पहिले नाट्य संमेलन मान. खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत झाले. आणि आता २०२४ साली शंभरावे नाट्य संमेलन पुणे -पिंपरी चिंचवड येथे होत आहे. या शंभरही नाट्य संमेलनांचा सविस्तर इतिहास अगदी निमंत्रण पत्रिकांसह लिहिला गेला पाहिजे. तशी व्यवस्था परिषदेनं करावी, ही विनंती.

३) संमेलनाच्या अध्यक्षानं मराठी रंगभूमीच्या संवर्धनासाठी काहीएक वेगळं काम करावं अशी अपेक्षा आहे. आणि त्यासाठी फक्त एक लाख रुपयांचा निधी ठेवलेला आहे. ही रक्कम फारच कमी आहे... ती वाढवावी...ही विनंती.

४) प्रायोगिक रंगभूमीचं क्षेत्र मुंबई - पुणे सोडून जिल्हा - तालुका पातळीवर विकसित होत आहे.आणि या प्रायोगिक नाटकांसाठी अपेक्षित रंगमंच उपलब्ध नाही. जिल्हा - तालुका पातळीवर २०० - २५० आसन क्षमता असलेली प्रायोगिक नाट्यगृहे बांधणे ही काळाची गरज आहे... प्रायोगिक रंगभूमीचा पुढील १०० वर्षांचा विचार करून अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त नाट्यगृहे बांधणे आवश्यक आहे... महाराष्ट्र शासनाने प्रायोगिक रंगभूमीची ही गरज लक्षात घ्यावी, ही विनंती.

५) झाडीपट्टी रंगभूमी... नागविदर्भातील चंद्रपूर - भंडारा -विशेषत: झाडीपट्टी रंगभूमीचं मुख्य केंद्र वडसा...चोख नक्षलग्रस्त विभाग...नाट्यवेडानं झपाटलेला परिसर. मुंबईकर- पुणेकर कलावंत मकरंद अनासपुरे, मोहन जोशी सारखे मान्यवर कलावंत झाडीपट्टी रंगभूमीवर चमकताना दिसतात. पण आजही ही नाटकं कनातीत २०×२० फुटांच्या रंगमंचावर ,दोरीवर अडकवलेल्या एका माईकवर सादर केली जातात... आणि म्हणून ही झाडीपट्टी रंगभूमीही काळा बरोबर अत्याधुनिक नाही पण कालसुसंगत आधुनिक तरी करा. प्रेक्षक आजही धुळयुक्त जमिनीवर बसून नाटक पाहतो.

एकीकडे एसी नाट्यगृहात नाटक पाहणारा प्रेक्षक आणि दुसरीकडे धुळीत बसून नाटक पाहणारा प्रेक्षक... अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त महाराष्ट्राला हे शोभनीय नाही. महाराष्ट्र सरकारने मागे पडलेल्या या नागवैदर्भीय रंगभूमीसाठी 'नेटलावून' काम करावे, ही विनंती.

आणि आता आणखी एक विनंती शासनाला.

दहाएक वर्षांपूर्वी रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीनं अभिजात भाषेसंबंधी एक अहवाल तयार केला होता आणि महाराष्ट्र शासनानं केंद्र सरकारला विनंती केली होती की मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा द्यावा. पण ते काम होतांना दिसत नाही.आणि म्हणून महाराष्ट्र सरकारने स्वतःच पुढाकार घेऊन अभिजात मराठी भाषा आणि बोली भाषा संवर्धनासाठी स्वतंत्र निधीची व्यवस्था करावी. प्रत्येक जिल्ह्यात अभिजात मराठी भाषा आणि बोली भाषा संवर्धन केंद्र स्थापन करावे. हा काळ इंग्रजी भाषा प्रभावाचा आहे आणि जागतिक गरजही आहे. तथापि आपलं भाषिक भान जाग ठेवायचं तर अशा प्रयत्नांचीही गरज आहे. प्रमाण भाषे प्रमाणेच विविध बोली भाषा मधूनही वाङमय लेखन होत असते. कविता, कथा, कादंबरी बरोबरच नाट्य लेखनही होत असते म्हणून ही विनंती.

मला जे सांगायचे होते ते सांगून झाले. आपण ते ऐकून घेतले... धन्यवाद. संमेलनाध्यक्ष पदाचा काळ संपला...पण माझं काम संपलं नाही... ते सुरूच राहील...हे कुरूप जग सुंदर होईपर्यंत सुरूच राहील...धन्यवाद.

प्रेमानंद गज्वी
अध्यक्ष
९९ वे अ. भा. मराठी नाट्य संमेलन, नागपूर

दि. ५ - ६ - ७ जानेवारी २०२४ या काळात पुणे पिंपरी- चिंचवड येथे संपन्न झालेल्या १०० व्या नाट्य संमेलनात अध्यक्षपदाची सूत्रं डॉ. जब्बार पटेल यांना प्रदान करतांना प्रेमानंद गज्वी यांनी केलेलं भाषण.